जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे अंतर्गत नियामक परिषदेवरील (Governing Council) नामनिर्देशित/ पदसिध्द सदस्यांची नियुक्ती करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

शासन निर्णय क्र.डीएमएफ-१०२५/प्र.क्र.७६/उद्योग-९,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: ०५ ऑगस्ट, २०२६.

<u>संदर्भ</u> :- १. शासन अधिसुचना क्र. एमडीएफ-०६१५/प्र.क्र.३४/उद्योग-९,दि.०१.०९.२०१६

२. केंद्रिय खाण मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश दि.१५.०१.२०२४

३. शासन अधिसूचना क्र. डीएमएफ-०१२४/प्र.क्र.१०/उद्योग-९ दि.११.१०.२०२४

४. जिल्हा खनिकर्म अधिकारी, पुणे यांचे पत्र क्र.खनिकर्म/कावि/२२६९/२०२५, दि.३१.०७.२०२५ व दि.२७.०६.२०२६

प्रस्तावना:-

खाण मंत्रालय, भारत सरकार यांनी खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, १९५७ मध्ये सुधारणा करून खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ हा शासन अधिसुचना, दिनांक २७.०३.२०१५ अन्वये अधिसूचित केला आहे.

२. प्रस्तुत खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ च्या कलम ९ (B) मधील तरतुदींनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये खाणबाधित क्षेत्र व व्यक्तींच्या विकासाकरिता जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करणे अपेक्षित आहे. नमुद तरतुदीस अनुसरून उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन अधिसूचना दि.०१ सप्टेंबर २०१६ अन्वये राज्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना, रचना व कार्यपध्दती याबाबत नियम विहित करण्यात आले आहेत.

३. केंद्रिय खाण मंत्रालय, भारत सरकार यांनी संदर्भाधीन क्र.२ येथील दि.१५.०१.२०२४ रोजीच्या आदेशान्वये खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ च्या कलम ९(B) मधील उपकलम ३ येथे नमूद नियामक परिषदेच्या संरचनेमध्ये सुधारणा करण्याबाबत आदेशित केले होते, त्यानुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत नियामक परिषदेच्या संरचनेमध्ये संदर्भाधीन क्र.३ येथील शासन अधिसूचनेन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

४. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन अधिसूचना दि.११.१०.२०२४ मधील तरतुदीस अनुसरून जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे अंतर्गत नियामक परिषदेवर (Governing Council) नामनिर्देशित/ पदसिध्द सदस्यांच्या नियुक्तीकरिता जिल्हा खनिकर्म अधिकारी, पुणे यांनी संदर्भाधीन

क्र. ४ येथील पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. जिल्हा खनिकर्म अधिकारी, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे अंतर्गत नियामक परिषदेवरील (Governing Council) नामनिर्देशित/ पदसिध्द सदस्यांच्या नियुक्तीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन अधिसूचना दि.१०.११.२०२४ मधील तरतुदीस अनुसरून जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे अंतर्गत नियामक परिषदेवर (Governing Council) नामनिर्देशित/ पदसिध्द सदस्यांच्या नियुक्तीकरिता जिल्हा खनिकर्म अधिकारी, पुणे यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता देण्यात येत आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली **"नियामक परिषदेची"** संरचना खालीलप्रमाणे राहील:-

अ. क्र.	नाव/पदनाम	कार्यालय/प्रतिनिधित्व	पदनाम
१.	श्रीम. सुनेत्रा अजित पवार, मा.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री, पुणे	मा.विधानसभा सदस्य, बारामती	सदस्य
२.	श्री.मुरलीधर किसन मोहोळ मा. सहकार आणि नागरी विमान वाहतूक, केंद्रीय राज्यमंत्री	मा. लोकसभा सदस्य, पुणे	सदस्य
३.	श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील मा. सहकार मंत्री	मा. विधानसभा सदस्य, आंबेगाव	सदस्य
४.	श्री. दत्तात्रय विठोबा भरणे मा.कृषी मंत्री	मा. विधानसभा सदस्य, इंदापूर	सदस्य
५.	श्री.चंद्रकांत पाटील, मा. उच्च व तंत्रशिक्षण	मा. विधानसभा सदस्य,कोथरुड	सदस्य
६.	श्रीम. माधुरी सतीश मिसाळ, मा. नगर विकास, परिवहन, सामाजिक न्याय,वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री	मा. विधानसभा सदस्य, पर्वती	सदस्य
७.	श्रीम. सुप्रिया सदानंद सुळे	मा. लोकसभा सदस्य, बारामती	सदस्य
८.	श्री.श्रीरंग अप्पा बारणे	मा. लोकसभा सदस्य, मावळ	सदस्य
९.	डॉ.अमोल रामसिंग कोल्हे	मा. लोकसभा सदस्य, शिरुर	सदस्य
१०.	श्री.बाबाजी रामचंद्र काळे	मा. विधानसभा सदस्य, खेड-आळंदी	सदस्य
११.	श्री. विजय शिवतारे	मा. विधानसभा सदस्य, पुरंदर	सदस्य
१२.	श्री. अण्णा दादू बनसोडे	मा. विधानसभा सदस्य,पिंपरी	सदस्य

१३.	श्री.शंकर हिरामण मांडेकर	मा. विधानसभा सदस्य, भोर-बेल्हा-मुळशी	सदस्य
१४.	श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली कटके	मा. विधानसभा सदस्य, शिरुर	सदस्य
१५.	श्री. सुनिल शंकरराव शेळके	मा. विधानसभा सदस्य, मावळ	सदस्य
१६.	श्री. शंकर पांडूरंग जगताप	मा. विधानसभा सदस्य,चिंचवड	सदस्य
१७.	श्री. बापुसाहेब तुकाराम पठारे	मा. विधानसभा सदस्य, वडगावशेरी	सदस्य
१८.	श्री. सिध्दार्थ अनिल शिरोळे	मा. विधानसभा सदस्य, शिवाजीनगर	सदस्य
१९.	श्री.भिमराव धोंडीबा तापकीर	मा. विधानसभा सदस्य,खडकवासला	सदस्य
२०.	श्री. चेतन विठ्ठल तुपे	मा. विधानसभा सदस्य, हडपसर	सदस्य
२१.	श्री. सुनील ज्ञानदेव कांबळे	मा. विधानसभा सदस्य, कॉन्टोमेंट	सदस्य
२२.	श्री. राहुल सुभाषराव कुल	मा. विधानसभा सदस्य, दौंड	सदस्य
२३.	श्री. महेश किसन लांडगे	मा. विधानसभा सदस्य, भोसरी	सदस्य
२४.	श्री. शरद सोनवणे	मा. विधानसभा सदस्य, जुन्नर	सदस्य
२५.	श्री. हेमंत रासने	मा. विधानसभा सदस्य, कसबा	सदस्य
२६.	मुख्य कार्यकारी अधिकारी	जिल्हा परिषद, पुणे	पदसिद्ध सदस्य
२७.	नगरपालिका/ नगरपरिषद / महानगरपालिका प्रशासनिक प्रमुख	पुणे जिल्ह्यातील खाण बाधित क्षेत्र संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासनिक प्रमुख	पदसिद्ध सदस्य
२८.	जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी	जिल्हा परिषद, पुणे	पदसिद्ध सदस्य
२९.	जिल्हा आदिवासी विकास अधिकारी	एकात्मिक आदिवासी विभाग कार्यालय, पुणे	पदसिद्ध सदस्य
३०.	जिल्हा आरोग्य अधिकारी	जिल्हा परिषद, पुणे	पदसिद्ध सदस्य
३१.	कार्यकारी अभियंता	जिल्हा परिषद, पुणे	पदसिद्ध सदस्य
३२.	जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी,	जिल्हा परिषद, पुणे	पदसिद्ध सदस्य
३३.	महाव्यवस्थापक	जिल्हा उद्योग केंद्र, पुणे	पदसिद्ध सदस्य
३४.	जिल्हा खनिकर्म अधिकारी	जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे	पदसिद्ध सदस्य सचिव

२. उपरोक्त नमुद जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत नियामक परिषदेवरील नामनिर्देशीत सदस्यांचा कार्यकाळ हा संबंधीत सदस्य हे जोपर्यंत लोकप्रतिनिधी (लोकसभा सदस्य अथवा विधानसभा सदस्य) म्हणून कार्यरत आहेत, तोपर्यंत राहील. संबंधीत लोकप्रतिनिधींचा लोकसभा/ राज्यसभा सदस्य अथवा विधानसभा/ विधानपरिषद सदस्य म्हणून असलेला कार्यकाळ संपुष्ठात आल्यानंतर त्यांचे नियामक परिषदेवरील सदस्यत्व आपोआप संपुष्टात येईल. तसेच शासन अधिसूचना दिनांक ११.१०.२०२४ मधील परि क्र.४ अन्वये सुधारीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान (प्रन्यास) नियम, (सुधारणा) २०२४ च्या नियम ८(३) नुसार विहित केल्याप्रमाणे जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे अंतर्गत व्यवस्थापकिय समितीची संरचना राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८०५१७०५३७०२५२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

LAXMIKANT GOPALRAO DHOKE

Digitally signed by LAXMIKANT GOPALRAO DHOKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELD, 2.5.4.20=413BEECA50B65438C7A037917CCF1F24D8CA684B65640DF6372EA731FFAC4DFC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E714BBCD4D43C6782884C7E7A2091F9F1EDC1D97EBB542C48B98FB8C8BDD6CF4, cn=LAXMIKANT GOPALRAO DHOKE
Date: 2026.08.05 17:06:46 +05'30'

(लक्ष्मीकांत ढोके)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, अपर मुख्य सचिव (खनिकर्म) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रती,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. मंत्री (खनिकर्म) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. राज्यमंत्री (खनिकर्म) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
५) महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
६) सहसचिव (खनिकर्म), यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, जि. पुणे
८) जिल्हा खनिकर्म अधिकारी, पुणे यांना निर्देशित करण्यांत येते की त्यांनी जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुण्याच्या कार्यकारी परिषदेतील (Governing Council) उपरोक्त सर्व सन्माननीय लोकसभा/ राज्यसभा/ विधानसभा/ विधानपरिषद सदस्यांना राजशिष्टाचारान्वये विहित कार्यपध्दतीनुसार सदरील नामनिर्देशनाबाबत आपल्या स्तरावरून अवगत करावे.
९) निवड नस्ती (उद्योग-९)